भंडारा जिल्हा पोलीस वार्तापत्र

(सकाळ)

जा.क्र. ५७१/माहिती कक्ष/वार्तापत्र
पोलीस अधीक्षक कार्यालय, भंडारा
दिनांक १४/०८/२०१७

**१) सोन्या चांदीच्या दागीण्याची चोरी. :—**

दिनांक १२/०८/२०१७ चे २३.३० वा.ते दि. १३/०८/१०७ चे ०४.०० वा. दर. यातील कोणीतरी अज्ञात चोराने कुणीही नसल्याची संधी साधुन फिर्यादीचे घरासमोरील दाराचा कोंडा काढुन दरवाजा तोडुन आत प्रवेश करून माज घरात असलेल्या लोखंडी गोदरेज आलमारीचा दरवाजा खोलुन आतमध्ये असलेल्या लॉकरमध्ये ठेवलेला एक चांदीचा करदोडा १२ ग्रॅम, चांदीच्या पायपटया वजन २० ग्रॅम, सोन्याच्या बिऱ्या वजन २ ग्रॅम, सोन्याचे २ मोठे व १२ लहान मनी वजन २ ग्रॅम व नगदी २५,०००/—रु. असा एकुण ३०,३००/—रु. चा माल चोरुन नेल्याने फिर्यादी हेमलाल उदाराम दमाये वय ६६ वर्ष, रा. सिरसोली यांचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन आंधळगाव येथे कलम ४५७,३८० भादंवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोउपनि. म्हैसकर पो.स्टे. आंधळगाव हे करीत आहेत.

**२) संगनमत करुन क्षुल्लक कारणावरुन काठीने व थापडबुक्यांनी मारुन जखमी केल्याने गुन्हा नोंद . :—**

दिनांक ०९/०८/२०१७ चे २०.०० वा. दर. यातील फिर्यादी श्रीराम भोदु बोरकर वय ७० वर्ष, रा. गोडेझरी यांचा मुलगा विलास श्रीराम बोरकर सोबत आरोपी यांचे भांडण सुरु असतांना फिर्यादी हा पत्नीसह भांडण सोडवण्यास गेला असता फिर्यादी याला आरोपीतांनी काठीने डावे पायाचे गुडघ्याजवळ व थापडबुक्यांने मारुन जखमी केल्याने फिर्यादीचे बयान व डॉक्टरी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन पालांदुर येथे कलम ३२४,३४ भादंवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोना. चनाप पो.स्टे. पालांदुर हे करीत आहेत.

**३) महिलेवर संशय घेवुन लांबाझोबी करुन पाहुण घेण्याची धमकी दिल्याने गुन्हा नोंद :—**

दिनांक १२/०८/२०१७ चे २०.३० वा. दर. यातील फिर्यादी ही आपल्या घरी शेळया बांधत असतांना यातील आरोपी हा फिर्यादीला पाहुण तुला दिरा सोबत जायला पाहीजे तुझे दिरा सोबत संबंध आहेत असे बोलुन तु मला बोलणारा कोण असे फिर्यादीने बोलले असता आरोपी हा फिर्यादीचे घरी छपरात जावुन तिच्या सोबत लांबाझोबी केली, लांबाझोबी सोडवण्यास सासु व सासरे मध्यस्ती आले असता आरोपीने फिर्यादीचे सासुला धक्का मारल्याने ती खाली जमीनीवर पडली त्यामुळे तिच्या उजव्या हाताला जखम झाल्याने व पुढे पाहुण घेण्याची धमकी दिल्याने फिर्यादी यांचे तोंडी व डॉ. रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन लाखांदुर येथे कलम ४४८,३२३,३२४,५०६ भादंवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोना. शेंडे पो.स्टे. लाखांदुर हे करीत आहेत.

**४) मोटार सायकलच्या धडकेत दोन जखमी . :—**

दिनांक १३/०८/२०१७ चे १७.३० वा. दर. यातील फिर्यादी रामरथन रामचंद्र बागडे वय ५९ वर्ष, रा. आदर्श नगर जवाहरनगर हा आपली मोटार सायकल क्र. एमएच ३६ एम ०४७३ ने डोडमाझरी टेकेपार वरुन जवाहरनगर येथे परत येत असतांना यातील आरोपी चालकांनी त्याचे ताब्यातील मोटार सायकल भरधाव वेगाने निष्काळजीपने चालवुन फिर्यादीचे मोटार सायकलला मागेहुन धडक मारुन फिर्यादी व मोटार सायकल चालक विजय नंदागवळी यांना खाली पाडुन जखमी करण्यास कारणीभुत झाल्याने तसेच अपघाताची सुचना न देता पळुन गेल्याने फिर्यादी यांचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन जवाहरनगर येथे कलम २७९,३३७ भादंवि. सहकलम १३४,१८४/१७७ मोवाका. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. साखरे पो.स्टे. जवाहरनगर हे करीत आहेत.

५) प्राणी निदर्यतेने कोंबुन वाहतुक करतांनी मिळुन आल्याने गुन्हा नोंद . :–

दिनांक १३/०८/२०१७ चे १३.३० वा. दर. यातील फिर्यादी हे शासकीय वाहनाने भंडारा शहरात पेट्रोलींग करीत असतांना यातील आरोपीने त्याचे ताब्यातील ट्रक हे हयगयीने व अती वेगाने ओव्हरटेक करीत असतांना त्यास थांबवुन चेक केले असता त्याचे वाहनात मोठे ६ रेडे व १३ म्हशी असे एकुण १९ जनावरे किंमती १,९०,०००/–रु. चे निदर्यतेने कोंबुन भरुन वाहतुक करतांनी मिळुन आल्याने सरतर्फे फिर्यादी पोना. दोनोडे यांचे रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन भंडारा येथे कलम २७९,२८९ भादंवि. सहकलम ११(ड) प्रा क्रू प्रति. कायदा. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोउपनि. थेर पो.स्टे. भंडारा हे करीत आहेत. आरोपी अटक आहे.

६) वाहन सार्वजनीक ठिकाणी थांबवुन येणाऱ्या जाणाऱ्या लोकांच्या जिवीतास धोका निर्माण केल्याने गुन्हा नोंद :–

दिनांक १३/०८/२०१७ चे १७.०० ते १७.३० वा. दर. यातील आरोपी चालकाने त्याचे ताब्यातील टाटा मॅजीक वाहन आमरोडवर येणाऱ्या जाणाऱ्या वाहतुकीस व लोकांच्या जिवीतास धोका निर्माण होईल अश्या स्थितीत उभी करतांनी मिळुन आल्याने पोलीस स्टेशन पवनी येथे कलम २८३ भादंवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोना. रामटेके पो.स्टे. पवनी हे करीत आहेत.

७) पॉयझनींग झाल्याने औषधोपचारा दरम्यान तरुणाचा मृत्यु . :–

दिनांक १३/०८/२०१७ चे १०.५० वा. दर. यातील मृतक गणेश हगरुजी ईखार वय २५ वर्ष, रा. सितेपार यांनी मशरुम खाल्याने त्यास पॉयझनींग झाल्याने त्यास औषधोपचारा करीता सामान्य रुग्नालय भंडारा येथे आनले असता डॉ. तपासुन मृत घोषीत केल्याने डॉक्टरी मेमो वरुन पोलीस स्टेशन भंडारा मर्ग क्र. ००/१७ कलम १७४ जाफौ. चे कागदपत्र प्राप्त झाल्याने पोलीस स्टेशन तुमसर येथे कलम १७४ जाफौ. प्रमाणे नंबरी मर्ग नोंद करण्यात आला. पुढील तपास पोहवा. माहुर्ले पोलीस स्टेशन तुमसर हे करीत आहेत.

८) महिला जळाल्याने औषधोपचारा दरम्यान मृत्यु . :–

दिनांक १२/०८/२०१७ चे १२.१५ वा. दर. यातील मृतक सौ. संध्या जगदीश उके वय ४२ वर्ष, रा. मुरमाडी सावरी ही दिनांक ०७/०८/२०१७ ला ६० ते ७० टक्के जळाल्याने तिला औषधोपचारा करीता सामान्य रुग्नालय भंडारा येथे आनले असता दिनांक १२/०८/२०१७ ला उपचारा दरम्यान मरण पावल्याने डॉ. मेमो वरुन पोस्टे भंडारा येथे मर्ग क्र. ००/१७ कलम १७४ जाफौचे कागदपत्र पोशि. माटे पोस्टे लाखनी येथे आणुन पेश केल्याने पोलीस स्टेशन लाखनी येथे कलम १७४ जाफौ. प्रमाणे नंबरी मर्ग नोंद करण्यात आला. पुढील तपास पोहवा. टेंभुर्णे पोलीस स्टेशन लाखनी हे करीत आहेत.

१०) अवैध दारु / जुगार अडयावर धाडी . :–

दिनांक १३/०८/२०१७ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी पोस्टे भंडारा, साकोली, पवनी व कारधा येथे दारू/ जुगार अडयावर धाडी घालुन एकुण ०५ गुन्हे दाखल करून आरोपीतांच्या ताब्यातुन १५ लिटर हा.भ. दारू किंमती १५००/–रु. व ११ लिटर ३४० मिली लिटर देशी दारु+ १ मोटार सायकल किंमती २३२७६/–रु. तसेच जुगारातुन किमती ६१०/रु असा एकुण कि. २५,३८६/रु चा माल जप्त करण्यात आला आहे.

११) मोटार वाहन कायदयाखाली कारवाई. :–

दिनांक १३/०८/२०१७ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी मोटार वाहन कायदयाखाली एकुण ८६ प्रकरणांची नोंद करण्यात आलेली असून अवैध प्रवसी ०२ तीन सिटर वाहनांवरती ०९ केसेस व तसेच ईतर वाहनांवरती ७५ केसेस करण्यात आलेल्या आहे.

पोलीस उपअधिक्षक (गृह)
भंडारा करिता
दुरध्वनी.क्र. ८८०५६५७२६२

प्रति,

जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा

वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.

प्रत, संगणक कक्ष, भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता.